# जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लिमिटेड

फ्लॅट क्र. १०१-१०२, पहिला मजला, 'अ' विंग, शिव-हरा, कस्तुरबा रोड क्र. २,
बोरिवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.

# ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

बँकेच्या सर्व मान्यवर सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. २५ सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वामी विवेकानंद एज्युकेशन सेंटर, मिस्किटा नगर, दहिसर (पूर्व), मुंबई-४०० ०६८** येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

१. दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या ४०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.

२. दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाचा कामकाजाचा अहवाल, लेखापरिक्षित ताळेबंद व नफा तोटा पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल, मागील वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती पूर्तता अहवाल व संचालक वा त्यांच्या कुटुंबातील सदस्यास दिलेल्या कर्जाचा तपशिल स्वीकृत करणे.

३. संचालक मंडळाने केलेल्या सन २०२२-२३ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

४. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी शासनाने निश्चित केलेल्या लेखापरिक्षकांच्या नामिकेतून (Panel of Auditors), भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या पूर्वपरवानगीप्रमाणे मे. संजय राणे व असोसिएटस्, या वैधानिक लेखापरिक्षक व्यवसाय संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या निवडीस तसेच नियुक्तीस व त्यांच्या मानधनास अनुसमर्थन देणे.

५. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंतर्गत हिशेब तपासनीस, समवर्ती हिशेब तपासनीस व संगणक तपासनीस इ. यांच्या संचालक मंडळाने केलेल्या नियुक्तीस व त्यांच्या ठरविलेल्या मेहनतान्यास अनुसमर्थन देणे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी अंतर्गत हिशेब तपासनीस, समवर्ती हिशेब तपासनीस इ. यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

६. बुडीत कर्ज रक्कमांच्या निर्लेखीकरणांस महाराष्ट्र सहकारी नियम ४९ अन्वये, वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेऊन मान्यता देणे.

७. ४१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

मुंबई,
**दिलीप दे. जोशी**

दि. २९.०८.२०२२
महाव्यवस्थापक

**टीप:-** गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास, सदर सभा बँकेच्या पोटनियम क्र.३५ (iii) प्रमाणे वरील ठिकाणीच अर्ध्या तासानंतर, वरील विषयसूचीनुसार घेण्यात येईल. तहकुबीनंतरच्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

## महत्त्वाच्या सूचना :

१. वार्षिक सर्वसाधारण सभेस फक्त बँकेच्या सभासदांनाच, ज्यांचे सभासदत्व दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंतचे आहे, त्यांना उपस्थित राहता येईल.

**२. सभासदांनी कृपया सभेस येताना आपले ओळखपत्र आणि सभेची सूचना सोबत आणावी.**

**३. ज्या सभासदांनी ओळखपत्रासाठी अर्ज भरून दिलेला नसेल, त्यांनी प्रशासकीय कार्यालयात संपर्क करून लवकरांत लवकर अर्ज भरून आपली ओळखपत्रे घ्यावीत.**

**४. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ पूर्वी बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी स्वरूपात सादर कराव्यात. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

**५. ज्या सभासदांनी आपल्या बदललेल्या भ्रमणध्वनी क्रमांकाची, पत्त्यांची किंवा खात्यांसाठी वारसदारांची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी केली नसेल, त्यांनी योग्य नोंद/बदल त्वरित करुन घ्यावेत.**

६. ज्या सभासदांनी आपले भागदाखले अद्यापपर्यंत नेले नसतील, त्यांनी ते संबंधित शाखेतून त्वरित घेऊन जावेत.

७. लाभांश जाहीर झाल्यापासून ३ वर्षांच्या आत लाभांश रक्कम सभासदाने न नेल्यास ती पोटनियम क्र.५८(d) नुसार राखीव निधीमध्ये जमा होते. या नुसार २०१८-१९ सालची लाभांश रक्कम अद्याप नेली नसल्यास त्यांनी ती दिनांक १० सप्टेंबर, २०२२ पूर्वी घेऊन जावी. अन्यथा सदर पोटनियमानुसार २०१८-२०१९ सालची लाभांश रक्कम दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी राखीव निधी मध्ये वर्ग करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

८. सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालाच्या प्रती बँकेच्या संकेतस्थळावर तसेच सर्व शाखांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्याकरीता सभासदांनी नजीकच्या शाखाव्यवस्थापकांशी संपर्क साधून सदर प्रत उपलब्ध करुन घ्यावी, ही विनंती.

**९. सभासदांनी आपल्या केवायसीची पूर्तता करुन घेण्याकरीता केवायसी कागदपत्रे आणि आपल्या नवीन फोटोसह शाखेत संपर्क साधावा. सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या आवश्यक केवायसी कागदपत्रांची व पॅनकार्डाची स्व-साक्षांकित छायाप्रत, बचत आणि इतर खात्यांवर व्यवहार करण्यासाठी बँकेत सादर करावी.**

१०. सर्व सभासदांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या, कुटुंबातील सदस्यांच्या व मित्रपरिवारांच्या ठेवी बँकेमध्ये ठेवण्यासाठी व त्यांना कर्जाची आवश्यकता असल्यास, कर्जासाठी आपल्या बँकेच्या सेवांचा लाभ घ्यावा. ज्या सभासदांचे आपल्या बँकेत बचत खाते नाही, त्यांनी ते उघडून बँकेस सहकार्य करावे.

**११. बँकेचा क्रियाशील सभासद (Active Member) होणे आणि तत्संबंधीचे हक्क अबाधित राहणेकरीता सभासदांच्या नावावर किमान रु. १,५००/- चे भाग व बँकेमध्ये किमान रु.७,०००/-ची ठेव असावी किंवा रु.१.०० लाखाचे कर्ज असणे आवश्यक आहे. तसेच मागील ५ वार्षिक सर्वसाधारण सभांपैकी, एका सभेस उपस्थित असणे आवश्यक आहे. याकरीता ज्या सभासदांच्या भागाची रक्कम रु.१,५००/- पेक्षा कमी असेल आणि ठेव रक्कम रु.७,०००/- पेक्षा कमी असेल अशा सभासदांनी, त्वरीत नजिकच्या शाखेत संपर्क साधावा व उपरोक्त नमूद तीनही बाबींची पूर्तता करुन घ्यावी.**

**१२. बँकेच्या खातेदारांस खात्यातील व्यवहारांची माहिती व अन्य आवश्यक माहिती एस. एम. एस. द्वारे मिळण्याची सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याकरीता शाखेमध्ये आपला भ्रमणध्वनी क्रमांक व संमतीपत्र देण्यात यावे. तसेच आपला दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी, आपला पत्ता बदलला असल्यास बदललेला पत्ता, आपल्या के. वाय.सी. कागदपत्रांच्या स्व-साक्षांकीत प्रतीसह संबंधित शाखेस द्यावेत, ज्यायोगे आपणांस संपर्क साधणे सोपे होईल.** https://tinyurl.com/JSSBL-membership-detail **या लिंकद्वारेसुद्धा आपण आपली सभासद माहिती अद्ययावत करु शकता.**

१३. यंदाची वार्षिक सर्वसाधारण सभा जरी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये घेण्यात येणार असली, तरी सभेमधील उपस्थितीस, कोविड-१९ च्या संदर्भात महाराष्ट्र राज्य सहकार व/अथवा 'मुंबई महानगरपालिका' यांच्याकडून काही प्रतिबंध जाहीर झाल्यास, ह्यांच्या उपस्थितीच्या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील.